मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर
जुना मुंबई पुणे रोड, आनंद कोळीवाडा मुंब्रा, ठाणे
पिन ४००६१२ दुरध्वनी क्रमांक ०२२,२५४६८३१५
e-mail cp.thane.mumbra@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# उल्लेखनिय कागगिरी

मुंब्रा एन.डी.पी.एस पथकाने अंमली पदार्थ विक्री करणा—या नायजेरीयन गुन्हेगारास शिताफीने ताब्यात घेवुन त्याचेकडून ५५ ग्रॅम मोफेडीन (एम.डी) अंमली पदार्थ जप्त केलेबाबत.

----------------------OOOOOOOO------------------------

मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर चे हद्यीत अंमली पदार्थाची विक्री व सेवन करण्याचे प्रमाण वाढलेले असुन त्या अनुषंगाने वरिष्ठ.पो.निरी.श्री.अनिल शिंदे यांनी पोलीस स्टेशनचे एन.डी.पी.एस पथकातील अधिकारी व अंमलदार यांना अशा प्रकारे अंमली पदार्थ विक्री व सेवन करणा-या इसमांचा शोधुन घेवुन त्यांचेवर कारवाई करणेबाबत आदेशीत केले होते. नमुद आदेशास अनुसरून मोफेडीन एम.डी हा अंमली पदार्थ विक्री करणारा एक इसम मुंब्रा पोलीस ठाणेचे हद्दीत येणार असलेबाबतची माहिती गुप्त बातमीदाराचे मार्फतीने सपोनि/केदार व सपोनि/जाधव यांना प्राप्त झाली होती. नमुद प्राप्त माहितीची खात्री करुन एन.डी.पी.एस पथकाने मुंब्रा पोलीस ठाणेचे हद्दीत काळसेकर हॉस्पिटल समोरील सर्विस रोडवर अंमली पदार्थाची विक्री करण्यास येणा-या इसमास ताब्यात घेणेकामी सापळा रचला होता. नमुदवेळी सदर ठिकाणी एक इसम मोटारसायकलवर आलेबाबत गुप्त बातमीदार यांनी त्याचेकडे अंगुलीनिर्देश करून माहिती दिल्याने सपोनि/केदार, सपोनि/जाधव व एन.डी.पी.एस पथकाने नमुद इसमास पाठलाग करून शिताफीने ताब्यात घेतले असता आरोपीचे अंगझडतीत **१,६५,०००/-** रूपयाचे **५५ ग्रॅम मोफेडीन एम.डी** हा अंमली पदार्थ मिळुन आला. अटक आरोपीत हा नायजेरियन देशाचा मुळ रहिवासी असुन <u>आरोपीचे नाव इफुनी जीनीका माईक उर्फ केसी</u>, वय- ३४ वर्षे, रा. सिंग १४ मेट्रो रेसिडेंन्सी, सेक्टर २७, खारघर, नवी मुंबई असे आहे. सदर आरोपीवर मुंब्रा पोलीस ठाणे गु.रजि.नंबर ।। १८७०/२०२४ एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ८ (क), २२ (ब), २९ प्रमाणे दिनांक ०८/०९/२०२४ रोजी गुन्हा दाखल करून आरोपीत यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

नमुद आरोपी इफुनी जीनीका माईक उर्फ केसी हा कुख्यात आंतरराष्ट्रीय आरोपी असुन यापुर्वी त्याचेवर मुंबई शहर येथे एन.डी.पी.एस कायदयाअंतर्गत गुन्हे दाखल आहेत व ब-याच गुन्हयांमध्ये त्याचा सहभाग आहे. **मुंब्रा पोलीस ठाणे एन.डी.पी.एस पथकाने एन.डी.पी.एस कारवाईचा धडाका कायम ठेवत आजपावेतो ४२५ सेवन करणा-यांवर व २१ ताबा कारवाई करण्यात आलेल्या आहेत व <u>ताबा कारवाईदरम्यान एकुण १,३९,०५००० /- किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात यश आलेले आहे</u>.** एन.डी.पी.एस पथकाचे मार्फतीने अंमली पदार्थांची विक्री व सेवन करणा-या इसमांवर यापुढे देखील अशाचप्रकारे कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

**नमुद कारवाई मा.पोलिस आयुक्त ठाणे शहर श्री. अशितोष डुंबरे,मा.पोलिस सह आयुक्त श्री. ज्ञानेश्वर चव्हाण,मा. अप्पर पोलिस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग श्री विनायक देशमुख, मा.पोलिस उपायुक्त परिमंडळ ०१, ठाणे, श्री सुभाष बुरसे,तसेच सहा.पोलिस आयुक्त सो,कळवा विभाग ,श्री उत्तम कोळेकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.अनिल शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/नितीन पगार, सपोनि/रोहीत केदार, सपोनि/गणेश जाधव, पोहवा/६४९३ अनिल मोरे, पोशि/८२११ वसिम तडवी, पोशि/७९७८ रौफ खान, पोशि/२५७१ सागर महांगडे, मपोशि/१९७८ दुर्वा देसाई यांनी केलेली आहे.**